महागाई व आस्मानी संकटाच्या सावटाखाली पोळा सण साजरा, बैलांची संख्या रोडावली >>पान 2

वृषभराजाच्या ऋणातून उतराईचा प्रयत्न पोळा सण उत्साहात साजरा >>पान 3

मेहकरात भव्य ट्रॅक्टर पोळा आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात उत्साहात साजरा >>पान 4

# दैनिक आपला विदर्भ



राम चरणनं मेगास्टार वडील चिरंजीवी यांना दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

आतील पान

**सुविचार**
प्रत्येक दिवशी नवीन संधी आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 33 ■ शनिवार, दि. 23 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## मस्तच! महाराष्ट्राला मिळणार आणखी एक वंदे भारत

### दोन शहरे जोडणार, अशी असतील स्थानके

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्राला आता आणखी एक वंदे भारत एक्स्प्रेस मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी नांदेड-मुंबई आणि पुणे-नागपूर वंदे भारत एक्स्प्रेसची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर आता आणखी वंदे भारत एक्स्प्रेस महाराष्ट्राला मिळणार असून मुंबईतून सुरू होणार आहे. आता मुंबई-लातूर ही दोन शहरे वंदे भारत एक्स्प्रेसने जोडली जाणार आहेत. त्यामुळे लातूरकरांना मुंबई गाठणे अधिक सोयीचे होईल.**

लातूर हे इतिहास, संस्कृती, आणि निसर्गाचा त्रिवेणी संगम असलेले ठिकाण आहे. लातूर येथे सिद्धेश्वर रत्नेश्वर मंदिर, अष्टविनायक मंदिर, विराट हनुमान मंदिर, सूरत शहवली दर्गा अशी धार्मिकस्थळे आहेत. यासह उदगीर किल्ला, औसा किल्ला, खरोजा लेण्या आणि गंज गोलाई बाजारपेठ आहे. तसेच देशातील सोयाबीनचे सर्वात मोठे व्यापारी केंद्र लातूर येथे आहे. त्यामुळे धार्मिक, ऐतिहासिक आणि व्यापारी केंद्र म्हणून लातूर प्रसिद्ध आहे.

हे. मुंबई आणि लातूर ही दोन शहरे एकमेकांना जोडण्यासाठी



लातूरमधील लोकप्रतिनिधी आणि प्रवाशांकडून मागणी केली जात होती. प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई-लातूर वंदे भारत एक्स्प्रेसने जोडण्यास मंजुरी मिळाली आहे. वंदे भारत एक्स्प्रेसमुळं लातूर आणि धाराशिव ही दोन शहरे आता पुणे आणि मुंबईला जोडण्यात येणार आहे. त्यामुळं लातूर आणि धाराशिवकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सध्या मुंबई ते लातूर हा ५२५ किमीचे अंतर आहे. रस्तेमार्ग हे अंतर कापण्यासाठी ११ ते १२ तासांचा वेळ लागतो. तर एक्स्प्रेसनेही जवळपास ९.३० तास लागतात. मात्र वंदे भारत एक्स्प्रेसमुळं हे अंतर ७ ते ७.३० तासांवर येणार आहे. मुंबई-लातूर एक्स्प्रेस सीएसएमटीवरुन सकाळी ६ वाजता सुटेल आणि लातूरला दुपारी १ ते १.३० वाजेपर्यंत पोहोचेल. वंदे भारत एक्स्प्रेस सीएसएमटी, दादर, ठाणे, कल्याण, पुणे, कुर्डुवाडी, धाराशिव आणि लातूर या स्थानकांवर थांबेल.

## मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्षपद राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे

**मुंबई /प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारनं मनोज जरांगे पाटील यांचं मुंबईतील २९ ऑगस्टचं आंदोलन सुरु होण्यापूर्वी मराठा आरक्षणासंदर्भात एक मोठा निर्णय घेतला आहे. मराठी आरक्षण उपसमितीच्या अध्यक्षपदामध्ये फेरबदल करण्यात आला आहे.मराठा समाजाच्या उपसमितीच्या अध्यक्षपदी राधाकृष्ण विखे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी चंद्रकांत पाटील हे या उपसमितीचे अध्यक्ष होते. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील उपसमिती मराठा समाजाची सामाजिक , आर्थिक शैक्षणिक



स्थितीबाबत आढावा घेत राहणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या आधी राज्य सरकारकडून उपसमितीचं पुनर्गठन करण्यात आलं आहे.

मराठा आरक्षण उपसमिती कोणती कामं करणार?

उपसमितीमार्फत मराठा आरक्षणाविषयक प्रशासकीय आणि वैधानिक कामकाजाचा समन्वय ठेवण्यात येणार आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरणांमधील शासनाच्या वतीनं बाजून मांडण्यासाठी नेमलेल्या समुपदेशींशी समन्वय ठेवण्यात येणार, सोबतच विशेष समुपदेशींना सूचना समितीकडून दिल्या जाणार आहेत. न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबतची कार्यपद्धती उपसमितीकडून ठरविले जाणार आहे.

न्या. संदीप शिंदे यांच्या समितीसोबत समन्वय ठेवणे. मराठा आंदोलन आणि त्यांचे शिष्टमंडळाशी चर्चा करणे. जातप्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय प्रक्रिया सुरळीत करणे. मराठा समाजासाठी केलेल्या योजना तसेच

## सायबर हल्लेखोरांच्या यादीत भारत जगात अव्वल

नवी दिल्ली : भारतासाठी एक अत्यंत चिंताजनक बाब समोर आली आहे. स्विस सायबर सुरक्षा फर्म 'ॲक्रोनिस'ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, सायबर हल्ल्यांच्या यादीत भारताने ब्राझील आणि स्पेनला मागे टाकले असून, सायबर हल्लेखोरांचे भारत सर्वात मोठे लक्ष्य बनले आहे.

अहवालात दिलेल्या माहितीनुसार, २०२५ मध्ये भारतात सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः विंडोज ऑपरेटिंग सिस्टम वापरणाऱ्या उपकरणांवर होणाऱ्या मालवेअर हल्ल्यांचे प्रमाण भारतात सर्वाधिक आहे. मे महिन्यात हे प्रमाण १२.४ टक्के होते, जे जूनमध्ये वाढून १३.२ टक्क्यांवर पोहोचले आहे. हा आकडा जगभरातील देशांपेक्षा जास्त आहे.

याशिवाय, अधिकृत ईमेलवर होणाऱ्या सायबर हल्ल्यांमध्येही वाढ झाली आहे. २०२४ च्या सुरुवातीला २० टक्के असलेले हे हल्ले २०२५ च्या पहिल्या सहामाहीत २५.६ टक्क्यांवर पोहोचले आहेत. सायबर गुन्हेगार आता क्रेडिट कार्ड आणि पासवर्डसारखी वैयक्तिक माहिती चोरण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स सारख्या अत्याधुनिक साधनांचा वापर करत आहेत.

अहवालात असेही म्हटले आहे की, जनरेटिव्ह एआयमुळे सायबर गुन्हेगारांसाठीचे तांत्रिक अडथळे कमी झाले आहेत. यामुळे फिशिंग ईमेल, बनावट इनव्हॉइस आणि अगदी डीपफेक स्कॅमही शोधणे अधिक कठीण झाले आहे.

## सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात अखेर एसआयटी स्थापन; परभणीच्या एकाही अधिकाऱ्याचा समावेश नाही

**दैनिक आपला विदर्भ**

**परभणी/प्रतिनिधी :** परभणीमध्ये घडलेल्या हिंसाचारानंतर न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. आता या प्रकरणात अखेर विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल आणि पारदर्शक चौकशी व्हावी, यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी एसआयटीची अधिकृत घोषणा केली असून, यामध्ये परभणी जिल्ह्यातील एकाही पोलीस अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा समावेश करण्यात आलेला नाही.

**हायकोर्टाच्या आदेशानंतर हालचालींना गती**

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मागील आठवड्यात राज्य सरकारला निर्देश दिले होते की, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणात आठ दिवसांच्या आत एसआयटी स्थापन करण्यात यावी. या आदेशाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालकांनी कारवाई करत स्वतंत्र तपास पथकाची स्थापना केली आहे.

या एसआयटीचे नेतृत्व सुधीर हिरेमठ यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. हिरेमठ हे सध्या पुणे सीआयडीचे विशेष पोलीस महानिरीक्षक आहेत आणि नुकतेच सीबीआयमधून महाराष्ट्रात बदली होऊन आलेले अधिकारी आहेत. त्यांच्याकडे या प्रकरणाचा तपास जबाबदारीने सोपवण्यात आला आहे.

**इतर सदस्य कोण?**

एसआयटी मध्ये सदस्य म्हणून नागपूर सीआयडीचे पोलीस अधीक्षक अभिजीत धाराशिवकर यांची तसेच नांदेड सीआयडीचे पोलीस उप अधीक्षक अनिल गवाणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे, या तपास पथकात परभणी जिल्ह्यातील कोणताही पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी सहभागी नसणार, असे स्पष्ट निर्देश राज्य



पातळीवरून देण्यात आले आहेत.

**सर्व तपास वरिष्ठ प ातळीवरून होणार**

या विशेष तपास पथकाच्या कार्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथील अपर पोलिस महासंचालक यांच्या थेट मार्गदर्शनाखाली राहणार आहे. त्यामुळे तपास अधिक उच्च पातळीवर आणि पारदर्शकतेने होणार, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण नेमकं काय?**

परभणी शहरात गेल्यावर्षी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापुढे संविधानाची विटंबना झाल्याची गंभीर घटना घडली होती. या प्रकारानंतर संपूर्ण शहरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. निषेध करताना आंदोलकांनी काही वाहनांची तोडफोडही केली होती. या पार्श्र्वभूमीवर पोलिसांनी अटक सत्र सुरु केले होते. अटक झालेल्यांमध्ये ३५ वर्षीय सोमनाथ सूर्यवंशी यांचा देखील समावेश होता. मात्र, अटकेनंतर काही दिवसांतच न्यायालयीन कोठडीत त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला. प्रारंभी, सोमनाथ यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला असल्याचा दावा करण्यात आला. मात्र, नंतर करण्यात आलेल्या शवविच्छेदन अहवालात त्यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे निष्पन्न झाले होते. यानंतर समाजाच्या विविध स्तरांत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता.

## अवैधरित्या ऑटोत गॅस भरताना एकास रंगेहात पकडले गुन्हा दाखल



**बुलढाणा/प्रतिनिधी:** खामगाव शहरातील फाटकपुरा भागातील रहिवासी सय्यद रिजवान सय्यद अमिर हा अवैधरित्या एका टिनपत्र्याच्या शेड मध्ये ऑटो मध्ये घरगुती वापराचा गॅस भरतांना पोलिसांना मिळुन आला. त्याचे जवळुन गॅस सिलेंडर, इलेक्ट्रिक मोटर पंप, नळी, रेग्युलेटर, वजन काटा व ऑटो असा एकुण ६५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीविरुध्द कलम ३, ७ जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५, सहकलम २८७ भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## बंजारा समाजाकडून तीज उत्सव मोठ्या उत्साहात साजरा



**बुलढाणा/प्रतिनिधी:** अनेक रूढी परंपरा संस्कृती लोप पावत चालल्या आहेत, मात्र बंजारा समाजाची तीज ही पारंपारिक, संस्कृती आजही जपली जाते.. बुलढाण्याच्या मेहकर तालुक्यातील पारखेड येथे तिज उत्सवाला सुरुवात झाली आहे.. विवाहित स्त्रिया आपले सौभाग्य टिकवण्यासाठी आणि अविवाहित युवती चांगला वर मिळवण्यासाठी उपवास करतात,या उत्सवांमध्ये हिरवळ, नृत्य, गाणे आणि पारंपरिक पक्वान्नांचा आनंद घेतला जातो.. बंजारा समाजात याचा वेगळा सामाजिक आणि सांस्कृतिक अर्थ आहे. तीच उत्साहामध्ये ११ दिवस अविवाहित तरुण मुली सकाळ संध्याकाळी आपल्या कुलदैवताचा जलाभिषेक करत पूजा अर्चा करतात.

## जिल्हा परिषद व पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुक; अंतिम प्रभाग रचना जाहीर

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ नुसार बुलडाणा जिल्हा परिषद तसेच त्याअंतर्गत येणाऱ्या १३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुक -२०२५ अनुषंगाने प्रभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर अंतिम प्रभाग रचना परिशिष्ट ८ (अ) व परिशिष्ट ८ (ब) या स्वरूपात तयार करण्यात आलेली असून ती आज दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व पंचायत समिती व तहसिल कार्यालयांचे सूचना फलक तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्ल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. या अंतिम प्रभाग रचनेच्या प्रकाशनामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भातील प्रक्रिया पुढे वेगाने गतीमान होणार असून, निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार व मतदारांना प्रभाग रचनेबाबत सुस्पष्ट माहिती मिळणार आहे.

## इव्ही धारकांसाठी आनंदाची बातमी, या महामार्गावर आता टोल नाही !

**मुंबई /प्रतिनिधी :** अटल सेतूवरून प्रवास करणाऱ्यांसाठी आता एक आनंदाची बातमी आहे. अटल सेतूवरून जाणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांना टोलसाठी आजपासून कोणत्याही प्रकारचे शुल्क मोजावे लागणार नाही . मंत्रिमंडळाच्या २९ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत राज्य सरकारने इलेक्ट्रिक वाहनांसाठी नवीन धोरण आणले होते, त्यानुसार राज्यातील प्रमुख महामार्गावर इलेक्ट्रिक वाहनांना टोल करातून वगळण्यात आले होते. त्याची अमलबजावणी आजपासून सुरू झाली आहे. आता अटल सेतूवरून जाणाऱ्या प्रत्येक इलेक्ट्रिक वाहनाला टोल माफ केला जाणार आहे. तसेच येत्या दोन दिवसांत मुंबई पुणे एक्सप्रेसवे आणि समृद्धी महामार्गावरही टोलमाफी केली जाणार आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढील पाच वर्षांपर्यंत टोलमध्ये सूट देण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक प्रणाली तयार करण्यात येणार आहे. हा निर्णय सध्या अटल सेतूपुरता मर्यादित आहे.

## जिल्ह्यातील मेहकर येथे शेतकऱ्यांनी साजरा केला अभीनव ट्रॅक्टर पोळा

### ट्रॅक्टरचे सारथी होऊन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव झाले ट्रॅक्टर पोळ्यात सहभागी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यात सर्वत्र बळीराजाचा सर्वात महत्त्वाचा सण बैलपोळा साजरा होत आहे... आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ट्रॅक्टरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणत शेती उपयोगी कामे केली जातात आजच्या शेतीमध्ये बैलांची आणि ट्रॅक्टर यांची उपयोगिता सारखीच असल्याने बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे पोळ्यानिमित्त ट्रॅक्टर पोळ्याचे आयोजन करण्यात आलं होतं या ट्रॅक्टर पोळ्या मध्ये केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव ट्रॅक्टर चालवत या पोळ्यात सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांसोबत रात्रंदिवस शेतात राबणाऱ्या बैलाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टिकोनातून सर्वत्र पोळा हा सण साजरा केला जातो परंतु आजच्या आधुनिक युगामध्ये शेतकऱ्याकडील बैल जोड्यांची संख्या कमी झाली आहे शेतीच्या कामगिरी आता ट्रॅक्टरचा उपयोग केला जातो किंबहुना त्या माध्यमातून शेतीची कामे केले जातात त्यामुळे पोळ्या सारखे सण उत्सव हे पुढेही कायम राहावे या दृष्टिकोनातून बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे शेतकरी बांधवांच्या वतीने एक आगळा वेगळा पोळा साजरा करत एक आभीनव मिरवणूक मेहकर शहरातील मुख्य मार्गाने काढण्यात आली ... या ट्रॅक्टर पोळ्यामध्ये जवळपास १५० ते २०० ट्रॅक्टर सहभागी झाले होते.. जे वर्षभर आपल्या बळीराजा करिता शेतात सर्जा राजाच्या बरोबरीने आजच्या आधुनिक युगात योगदान देत असतात असे ट्रॅक्टर देखील आज आपल्याला शहरातील रस्त्यावर दिसुन आले...या ट्रॅक्टर पोळ्यामध्ये केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव माजी आमदार संजय रायमुलकर युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळुकर शहर प्रमुख जयचंद भाटिया यांच्यासह शिवसेनेचे



पदाधिकारी युवा सेना पदाधिकारी आणि शेकडो शेतकरी आपले ट्रॅक्टर घेऊन या ट्रॅक्टर पोळ्याच्या रॅलीमध्ये सहभागी झाले होते ..

## राष्ट्रीय अंतराळ दिवस

आज २३ ऑगस्ट, आजचा दिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून संपूर्ण साजरा केला जातो. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला कारण याच दिवशी भारताने चंद्रावर तिरंगा फडकावला. या गौरवशाली घटनेची आठवण म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून घोषित केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीयांच्या मनात या दिवसाची स्मृती कायमस्वरूपी कोरली गेली या महान दिवसाला आज दोन वर्ष पूर्ण होत आहे. २३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान – ३ या नावाने ओळखली जाते. याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला. २००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्रोने सुरवात केली त्यानंतर २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती. चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग होता. या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्वास आहे याच विश्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान २ मोहिमेत आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. चांद्रयान २ मोहिमेच्या अपयशातून धडा घेत चांद्रयान ३ मोहिमेवेळी शास्त्रज्ञांनी पुरेपूर काळजी घेतली होती. यानातील काही घटक ऐनवेळी कार्यन्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती. सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले होते त्यामुळे यावेळी चंद्रयान ३ यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्वास देशातील १४० कोटी जनतेला होता. इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्वास सार्थ ठरवला. चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला. या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळाली. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळाली. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास आली एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरली. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली. चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. ७८ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे. या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. चंद्रावर तिरंगा फडकावून अंतराळ क्षेत्रात महासत्ता होण्याच्या दृष्टीने पाऊल टाकणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# महागाई व आस्मानी संकटाच्या सावटाखाली पोळा सण साजरा, बैलांची संख्या रोडावली

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी:** शेतीत यांत्रिकीकरणाचा वापर वाढला असला तरी ग्रामीण भागात बैलांचे स्थान अजूनही अनन्यसाधारण मानल्या जाते शेतकऱ्यांच्या भावना कृतज्ञता आणि संस्कृतीचा वारसा यांचा संगम मानला जाणारा बैलपोळा हा सण नुकत्याच आलेल्या अस्मानी संकटाच्या सावटाखाली व महागाईच्या सावटाखाली साजरा करण्यात आला ग्रामीण भागातही बैलांची संख्या रोडावल्याचे निदर्शनास आले आहे.



शेती व्यवसायात पूर्वीपासूनच बैलाचे स्थान अनन्यसाधारण आहे बैल हा केवळ जनावर नसून शेतकऱ्याच्या कुटुंबातील एक सदस्य मानला जातो पूर्वीपासूनच शेती व्यवसायात शेतकऱ्याचा मुख्य साथीदार ठरला आहे वैदिक ग्रंथामध्येही तसेच हिंदू संस्कृतीमध्ये गाय व बैलांना देवत्व दिले गेले आहे बैला प्रति कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा हा सण पूर्वीपासूनच शेतकऱ्यांमध्ये महत्त्वाचा मानला जातो शेती व्यवसायात मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण झाले असले तरी गाय व बैलाचे महत्व अजूनही कमी झालेले नाही त्यामुळे बैलपोळा हा सण केवळ एक सण म्हणून नव्हे तर शेतकऱ्यांच्या भावना कृतज्ञता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संगम मानला जातो या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना स्नान घालून त्यांची सजावट करतात वेगवेगळ्या प्रकारचे साज घालून मनोभावे पूजन करतात या दिवशी बैलांना संपूर्ण विश्रांती देऊन आदराने वागविल्या जाते घरोघरी स्त्रियांच्या हातून बैलाची पूजन केल्या जाते काळाच्या ओघात मात्र शेती क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण झाले आहे तसेच बैलांचा सांभाळ करणे श्रमाचे व खर्चिक झाल्यामुळे त्याचप्रमाणे गौवंशाची कत्तल मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे बैलांची संख्या झपाट्याने कमी होत आहे येणाऱ्या काळात ही संख्या अजूनही कमी होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत यावर्षी सुरुवातीपासूनच शेती व्यवसायावर अस्मानी संकटाची मालिका सुरू आहे मागील पंधरा दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे मागील दोन वर्षापासून सोयाबीन सह इतर शेतमालाचे भाव हमीभाव पेक्षाही कमी झाले आहेत तर जीवनावश्यक वस्तू व शेती निविष्ठांचे भाव गगनाला भिडले आहेत वाढती महागाई व शेतमालाला मिळत नसलेले बाजार भाव यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असताना यावर्षी अतिवृष्टीमुळे खरीप पिकांनी धोक्याची पातळी गाठली आहे याही परिस्थितीत शेतकऱ्यांनी बैला प्रति कृतज्ञता दाखवत पोळा सण साजरा केला आहे शहरी भागासह ग्रामीण भागातही बैलांची संख्या घटली असल्याचे निदर्शनास आले आहे.

### मातीच्या बैलाचे पूजन करण्याची परंपरा

पोळा सण हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा सण आहे या सणाला पूर्वीपासून मातीच्या बैलाचे पूजन करण्याची परंपरा आजही कायम आहे घरोघरी बैलांची प्रतिकृती म्हणून मातीच्या बैलाची पूजन केले जाते तसेच दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा भरविला जातो.

## राम चरणनं मेगास्टार वडील चिरंजीवी यांना दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा, सेलिब्रेशनचा व्हिडिओ केला शेअर

मुंबई : मेगास्टार चिरंजीवी आज २२ ऑगस्ट रोजी त्यांचा ७० वा वाढदिवस साजरा करत आहेत. या निमित्तानं सुपरस्टारला त्याचे चाहते शुभेच्छा देत आहेत. दरम्यान चिरंजीवीनं त्यांच्या चाहत्यांना निराश केले नाही. अभिनेत्याच्या वाढदिवसाच्या एक दिवस आधी त्यांच्या आगामी चित्रपट विश्वम्भराचा टीझर शेअर करून चाहत्यांना एक खास भेट दिली आहे. आता अभिनेत्याचा स्टार मुलगा राम चरणनं त्यांच्या वडिलांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. राम चरणनं एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो त्यांच्या वडिलांचा वाढदिवस साजरा करताना दिसत आहे. मेगास्टार वडील चिरंजीवी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना, राम चरणनं त्याच्या इंस्टा पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिलं, आज फक्त तुमचा वाढदिवस नाही तर एका अतुलनीय माणसाचा उत्सव आहे, तुम्ही माझे नायक आहात, माझे मार्गदर्शक आहात, माझी प्रेरणा आहात, माझे प्रत्येक यश, विजय आणि आदर हे सर्व तुमच्यामुळं आहे, ७० व्या वर्षीही तुम्ही मनाने तरुण आहात आणि तुम्ही लोकांना प्रेरणा देत आहात, मी तुम्हाला उत्तम आरोग्य, आनंदाची शुभेच्छा देतो आणि माझे वडील असल्याबद्दल धन्यवाद, वाढदिवसाच्या शुभेच्छा पारा चिरंजीवी कोनिडेला.

## हनी ट्रॅपवाल्या प्रफुल्ल लोढाला पिंपरी पोलिसांकडून अटक; ३६ वर्षीय महिलेचे गंभीर आरोप, तपास सुरू

पुणे : हनी ट्रॅप आणि लैंगिक अत्याचार प्रकरणातील प्रफुल्ल लोढाला पिंपरी- चिंचवडच्या बावधन पोलिसांनी अटक केली आहे. बावधन पोलीस ठाण्यात ३६ वर्षीय पीडित महिलेने प्रफुल लोढाविरोधात अत्याचार केल्या प्रकरणी तक्रार दिली होती. या गुन्ह्यातील तपासाठी बावधन पोलिसांनी लोढाला ताब्यात घेतलं आहे. प्रफुल्ल लोढाला बावधन पोलिसांच्या स्वाधीन करण्यात यावं म्हणून कोर्टाला हस्तांतरित वॉरंट मागण्यात आलं होतं. ती मंजुरी मिळताच आज सकाळी ऑर्थर रोड कारागृहातून ताब्यात घेण्यात आलं. काही वेळापूर्वी बावधन पोलिसांनी अटकेची कारवाई पूर्ण केली, आता थोड्यावेळात त्याला न्यायालयात हजर केलं जाईल.

२७ मे २०२५ रोजी पुण्यातील बालेवाडी येथील नामांकित हॉटेलमध्ये महिलेला बोलवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. प्रफुल्ल लोढाने पीडित महिलेच्या पतीला नोकरी लावतो असे आमिष दाखवून हॉटेलवर बोलवून घेऊन अत्याचार केला आहे. याआधी मुंबईमधील अंधेरी एमआयडीसी आणि साकीनाका पोलीस ठाण्यात हनी ट्रॅप आणि अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्या प्रकरणी गुन्हा दाखल आहे.

'हनी ट्रॅप'सह एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर काम देण्याच्या आमिषाने अत्याचार केल्याप्रकरणी मुंबईतील अंधेरी एमआयडीसी आणि साकीनाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असलेल्या प्रफुल्ल लोढा याच्या विरोधात बलात्कारप्रकरणी गुन्हा बावधन पोलिस ठाण्यात दाखल झालेला आहे. त्यानंतर आता पुण्यातील बावधन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर १७ जुलैला लोढाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# बुलढाणा जिल्हा अधीक्षक कार्यालयात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे पोलीस अधीक्षकांच्या हस्ते लोकार्पण





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** क्राईम सीन ॲप्लिकेशन अद्ययावत करणे, घटनास्थळी फॉरेन्सिक पथक धडकणार, घटना स्थळावरील पुरावे फोटो, व्हिडिओच्या माध्यमातून एकत्रित करणे, रक्त, डीएनए बलात्काराच्या गुन्ह्यातील पुरावा संकलित होणार यासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन आता महत्वपूर्ण ठरणार आहे. गुन्हा सिद्ध करण्यासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन चा वापर आता बुलढाणा जिल्ह्यात होणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात येथे जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे हस्ते मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे फीत कापून लोकार्पण करण्यात आले.

जिल्ह्यात सध्या १ व्हॅन आली असून अजुन ५ उपविभागीय पोलीस कार्यालयात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी दिली आहे. व्हॅनमध्ये रक्त, डीएनए संग्रहण आणि बलात्कारासारख्या गुन्ह्यात आवश्यक पुरावे गोळा करणे. वैज्ञानिक तज्ज्ञ व सहाय्यक कर्मचारी व्हॅनमध्ये आहे. तसेच स्फोटक पदार्थ तपासणी, सायबर गुन्ह्यांमध्ये तपासणीसाठी विशेष फॉरेन्सिक किट्स उपलब्ध आहेत. तसेच व्हॅन सीसीटीव्हीने सज्ज असून कनेक्टेड असणार आहे. त्यामुळे संबंधित पोलीस स्टेशनला सबंधित गुन्ह्या संदर्भात गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती देता येणे शक्य होणार आहे.

# खामगावात परंपरागत पोळा सण लंपी च्या निर्बंधात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील फरशी भागात रविवारी वृषभ राजाचा सण पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. शेतात राब-राब राबणारा तसेच शेतकऱ्याचा खराखुरा सोबती असलेल्या वृषभ राजाचा पोळा सण लंपी आजाराच्या निर्बंधात साजरा करण्यात आला.





दरवर्षी खामगाव शहरात शेतकरी आपल्या बैलांना सजवून फरशी येथे पोळ्यात घेऊन येतात. खामगावातील शिवाजीराव देशमुख व देवेंद्र देशमुख यांच्या हस्ते सर्वप्रथम मानाची बैलाची पूजा करण्यात आली. देशमुख वाड्यामधील परंपरागत गुढी तसेच इतरही मानाच्या गुढ्या फरशी येथे आणण्यात आल्या होत्या. फरशी येथे तोरण बांधण्यात आले होते. बैलाची पुजा अर्चा करून ठोंबरा वाटून तोरण तोडून पोळा फोडण्यात आला. विविध रंगबेरंगी झुला सजवून अनेक शेतक-यांनी बैलांच्या शिंगांना आकर्षक रंग देवून अंगावर झुला टाकुन शिवाजीनगर पोलीस स्टेशनजवळ बैलांचा पोळा भरला होता. आकर्षक रंगांनी सजवून नटलेल्या वृषभ राजास मोठ्या थाटामाटात शेतकऱ्यांना पोळ्यात आणले होते. शहरातील दाळफैल, सुटाळपुरा, गोपाळ नगर, यासह शिवाजीनगर सतीफैल भागातील शेतक-यांनी आपले बैल वाजत गाजत फरशीवरील पोळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी आणले होते. कित्येक वर्षापासून खामगाव शहरांमध्ये शितला माता मंदिर जुने मारुती मंदिर येथे परंपरागत पोळा साजरा केला जातो मोठ्या उत्साहात हा सण गुणीगोविंदाने सामाजिक ऐक्याचे प्रतीक म्हणून समृद्धीचे प्रतीक म्हणून तसेच वृषभ राजाचे प्रतीक म्हणून हा साजरा केला जातो मात्र या वर्षापासून लंपी आजारामुळे कमी ठेवण्याचे प्रशासनाचे आदेश होते त्याचा आदेशाचे पालन करत लंपीचा प्रादुर्भाव होऊ नये या दृष्टिकोनातून आम्ही गुढीची पूजा करून आणि एक सिम्बॉलिकल बैलाची पूजा करून हा पोळा साजरा केला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित


## संक्षिप्त...

### वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात मंत्र्यांसमोरच महानगरपालिका उपायुक्तांच्या डोळ्यात पाणी



**नवी मुंबई/प्रतिनिधी:** वनमंत्री गणेश नाईक वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित केलेल्या जनता दरबारात चक्क महानगरपालिका उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या डोळ्यात पाणी आले होते. मंत्री गणेश नाईक यांच्या समोरच शिक्षण विभाग अधिकारी संघरत्ना खिल्लारे यांना रडू कोसळल्याने हे भुषणावह नाही असा आरोप मनसेने केला आहे. काही महिन्यांपूर्वी महापालिका शाळेची सहल इमॅजिका येथे गेली होती. यावेळी १४ वर्षांच्या आयुष सिंग याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी मनसेने चौकशीची मागणी केली होती. यामुळे सहल आयोजित केलेल्या ठेकेदाराचे बिल थांबवले होते. हे बिल देण्यासाठी भाजपाचे पदाधिकारी संघरत्ना खिल्लारे यांच्यावर दबाव आणत असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

### भिवंडी - ठाणे बायपास रस्त्यावर कार ने घेतला अचानक पेट



**भिवंडी/प्रतिनिधी:** भिवंडी ठाणे बायपास रस्त्यावरील मानकोली या ठिकाणी रात्री ८ वाजताच्या सुमारास टाटा निक्सन या चालत्या कार ने अचानक पेट घेतल्याची घटना घडली आहे. पाहता पाहता कार पूर्ण आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहे. आधीच या मार्गावर सदैव वाहतूक कोंडी असल्याने वाहन चालक त्रस्त असताना या कार जळण्याचे त्यामध्ये भर पडली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. आग लागल्याचे लक्षात आल्याने कार मधील चालक व सहकारी वेळेतच बाहेर पडल्याने सुदैवाने जीवितहानीटळलीआहे.

### जातीचा दाखला मिळवण्यासाठी बनावट टीसी; दिग्रसच्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ :** जातीचा दाखला काढण्यासाठी बनावट शाळा सोडल्याचा दाखला (टीसी) दाखल केल्याप्रकरणी दिग्रस शहरातील सचिन राम ढंडोरे या तरुणाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही घटना १५ जून रोजी सकाळी दहा वाजताच्या सुमारास उपविभागीय अधिकारी कार्यालय, पुसद येथे उघडकीस आली.

या प्रकरणी नायब तहसिलदार संदीप सोनकुसरे यांनी पुसद उपविभागीय कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली. त्यानुसार, आरोपी सचिन ढंडोरे याने जातीचा दाखला मिळवण्यासाठी खोटा शाळा सोडल्याचा दाखला सादर केला होता. शासनाची फसवणूक करण्याचा त्याचा प्रयत्न असल्याचे लक्षात आल्याने तात्काळ पोलिसांकडे धाव घेण्यात आली.

तक्रारीवरून दिग्रस पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३३५, ३३६, ३४० व ३१८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दिग्रस पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक मुरकुटे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# वृषभराजाच्या ऋणातून उतराईचा प्रयत्न पोळा सण उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ वैष्णवी बोडखे

**वाशीम:** काळ्या मातीत वर्षभर राबणाऱ्या, कष्टकरी शेतकऱ्याच्या साथीदार वृषभराजाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी, शेतकऱ्यांनी भावपूर्ण श्रद्धेने आणि परंपरेनुसार पोळा सण मोठ्या उत्साहांत साजरा केला. घरच्या लक्ष्मीनेने आपल्या सर्जा-राजाचा साजशृंगार करून, औक्षण व पूजा अर्चा केली आणि त्याच्या शिंगावर काकडी फोडून कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

पोळा हा शेतकऱ्यांच्या कृषीसंस्कृतीचा अविभाज्य भाग असून, वृषभाचे महत्त्व अधोरेखित करणारा सण आहे. या दिवशी बैलांचे आकर्षक सजवाट केली जाते. ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढली जाते आणि संपूर्ण गावकुसातून सर्जा-राजा मिरवित, मंगलाष्टकांच्या सुरात त्याचे प्रतीकात्मक विवाह सोहळे साजरे केले जातात. संपूर्ण कुटुंब नव्या पोशाखात सहभागी होत, या सणाला धार्मिक व सामाजिक एकतेचे रूप देते.



### बैलांची संख्या घटली, तरी परंपरा अबाधित

गत काही वर्षांत शेतीत यांत्रिकीकरणामुळे बैलांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. ट्रॅक्टर व अन्य आधुनिक यंत्रांच्या वापरामुळे बैलांची गरज कमी झाली असली, तरी सण साजरा करण्याची परंपरा मात्र तितक्याच श्रद्धेने जपली जात आहे.

शहरात स्थायिक झालेली शेतकरी कुटुंबेही मातीचे बैल आणून पूजा करतात. काही ठिकाणी ट्रॅक्टरलाही साजशृंगार करून ''ट्रॅक्टर पोळा'' साजरा केला जातो. ही बदलती रूपं असूनही, ग्रामीण संस्कृतीतील सण, परंपरा आणि श्रद्धा अजूनही तितक्याच ताकदीने पाळली जात असल्याचे दिसून येते.

बैलांची मिरवणूक झाल्यानंतर त्यांना मारोती मंदिरात नेऊन दर्शन घडवले जाते. त्यानंतर घरी विविध गोडधोड खाऊन, बैलांना गोड घास भरवून त्यांच्याशी असलेले नातं दृढ केले जाते. या निमित्ताने वर्षभराच्या कष्टांची मरगळ झटकून नवचैतन्य घेऊन येणारा सण शेतकरी वर्ग मोठ्या जल्लोषात साजरा करतो.

## पुण्यात आता 'मास्क मॅन'ची दहशत

पुणे : पिंपरी-चिंचवड शहरात एका अज्ञात व्यक्तीने 'मास्क मॅन'च्या रूपाने खळबळ उडवून दिली आहे. चेहऱ्यावर मास्क, आणि हातात धारदार चाकू घेऊन भरदिवसा रस्त्यावर वावरताना या व्यक्तीचा व्हिडीओ समोर आला आहे. निगडीतील बजाज ऑटोमोबाईल समोरील एचपी पेट्रोल पंप परिसरात ही घटना घडली असून, स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. निगडी परिसरात भर दिवसा नागरिक आणि वाहनचालकांची वर्दळ असताना, एका तरुणाने चेहऱ्यावर मास्क घालून आणि हातात चाकू घेऊन रस्ता पार केला. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. यामुळे नागरिकांनी भीती व्यक्त करत स्थानिक पोलिसांकडे दखल घेण्याची मागणी केली आहे. या मास्क मॅनने चेहरा पूर्णपणे झाकल्यामुळे त्याची ओळख पटवणे अवघड झाले आहे. हातात धारदार शस्त्र घेऊन सार्वजनिक ठिकाणी फिरताना हा व्यक्ती दिसत आहे.

## यंदाचा बैलपोळा अतिवृष्टीच्या सावटात साजरा झाला



दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड :** महाराष्ट्रात बैलपोळा सण हा दरवर्षी साजरा करतात. शेतकरी आपल्या बैलांना सजवून, त्यांचे पूजन करून हा सण साजरा करतात. दरवर्षी श्रावण महिन्यातील पिठोरी अमावस्येला साजरा होणारा हा सण शेतकऱ्यांसाठी एखाद्या मोठ्या उत्सवासारखा असतो. मात्र, यंदा गेल्या काही दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. त्यामुळे यंदा मात्र, बैलपोळ्याच्या उत्साहावर मुसळधार पावसाने अतिवृष्टीचे सावट घातले आहे. गेल्या काही दिवसांपासून यवतमाळ जिल्ह्यात उमरखेड तालुक्यात जोरदार पाऊस कोसळत आहे. यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तर गावे पाण्याखाली गेली असून यात गावाला मोठा फटका बसला. पावसामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले असताना सुद्धा आज उमरखेड तालुक्यात शेतकऱ्यांनी आपल्या बळी राजाचे आभार माणण्यासाठी व कृतज्ञता व्यकत करण्यासाठी बैलपोळा सण साजरा केला.

पावसामुळे झालेले नुकसानामुळे शेतकरी खचला असून त्यांना तातडीच्या मदतीची गरज आहे. सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## मालेगाव नगरपंचायती च्या प्रारुप प्रभाग रचनेच्या कार्यावर प्राथमिक आक्षेप दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी:** नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीकरिता १८ ऑगस्ट रोजी नगरपंचायत निकाल प्रभाग रचना जाहीर केली होती याबाबत आक्षेप तक्रार २१ ऑगस्ट पर्यंत दाखल करण्या संबंधी मुदत देण्यात आली होती या अनुषंगाने आज २१ ऑगस्ट रोजी शेख फारूक यांनी मालेगाव नगरपंचायत निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचना कार्य बाबत नगरपंचायत कार्यालयामध्ये आक्षेप दाखल केला आहे. या संदर्भात शेख फारूक यांनी ३१ जुलै रोजी मालेगाव नगरपंचायत च्या प्रारूप प्रभाग रचनेच्या कामामध्ये स्थानिक कर्मचारी चा सहभाग करू नये अशी मागणी मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती सर्व प्रभाग रचने मध्ये असलेले कर्मचारी व त्याचा हुद्दा याची माहिती सुद्धा माहिती अधिकार यामध्ये मागितले असतात सदर माहिती गोपनीय असल्यामुळे देता येत नसल्याचे अधिकाराच्या माहिती संबंधित दाखल केलेल्या अर्जाच्या उत्तरामाचे देण्यात आल्याचे शेख फारुख यांनी सांगितले यासंबंधी प्रभाग रचनेच्या कार्यावरून नमूद असलेल्या विषयाप्रमाणे शेख फारूक यांनी प्राथमिक अक्षय दाखल केला असून वेळप्रसंगी न्यायालयात जाण्याचा इशारा सुद्धा यावेळी दिला आहे. यामुळे मालेगाव नगरपंचायत निवडणूक पुन्हा लांबणीवर जाणार की ठरल्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे वेळेत होईल याकडे शहरवासी यांचे लक्ष लागले आहे.

### माळी समाजाबद्दल वादग्रस्त वक्तव्य, व्हायरल व्हिडिओवर हाकेंचं स्पष्टीकरण

सोलापूर : ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमुळे हाके यांच्या अडचणी वाढल्या असून ओबीसी समाजातच फूट पडल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र, माझा हा व्हिडिओ म्हणजे खोडसाळपणा असल्याचे हाके यांनी म्हटले. सध्या ओबीसी समाजाचे नेतृत्व माळी समाजाकडून धनगर समाजाकडे आले आहे, ही माळी समाजाची पोटदुखी आहे. भुजबळांनी कोणाला मोठे होऊ दिले नाही, अशा पद्धतीचे वक्तव्य करताना लक्ष्मण हाके यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे.

## सर्प दंशाने वरखेडीत बैलाचा मृत्यू; पोळ्याच्या दिवशीच घडली दुर्घटना



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी:** धुळे तालुक्यातील वरखेडी गावात आज सायंकाळच्या सुमारास सर्पदंशाने बैलाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वरखेडी गावातील शेतकरी असलेल्या विलास धनगर यांनी सकाळीच आपली बैल शेतात चरण्यासाठी सोडली असता एका बैलाला सर्पाने दंश केल्याने त्याचा जागी मृत्यू झाला याची घटना घडली आहे. आज पोळा या दिवशीच झालेल्या दुर्दैवी घटनेमुळे शेतकऱ्यावर दुःखाचे डोंगर पसरले आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा करून आपल्याला योग्य ती भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी एवढी केली आहे.

## धार्मिक सण, जयंती उत्सव परवानगीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** गणेशउत्सव, दुर्गाउत्सव, विविध जयंती उत्सव तसेच इतर धार्मिक व सांस्कृतिक उत्सव साजरे करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विशस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१-क अन्वये परवानगी घेणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व मंडळांनी परवानगी अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावे, असे आवाहन सहायक धर्मदाय आयुक्त दु.के. साहू यांनी केले आहे.

परवानगी अर्ज धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्या www.charity.maharashtra.gov.in अधिकृत संकेतस्थळावर 'माहिती प्रणाली' या सदराखाली ४१-क परवानगी या शिर्षकात उपलब्ध आहे. अर्ज करण्याची सविस्तर पद्धत तसेच आवश्यक कागदपत्रांची माहिती या ठिकाणी देण्यात आली आहे.

ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : मंडळाच्या ठरावाची प्रत, जागा मालकाचे ना-हरकत पत्र, तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी लाईट बिल व आधारकार्डची प्रत(संबंधित ग्रामपंचायत/नगरपरिषद परवानगीसह), पदाधिकाऱ्यांचे ओळखपत्र (आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक आयोग ओळखपत्र इ.) प्रथम वर्ष असल्यास मागील वर्षाचा हिशोब, मागील वर्षी घेण्यात आलेल्या ४१- परवानगीची प्रत कागदपत्रांची आवश्यकता नाही.

परवानगी मिळण्यासाठी वरील सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक असून, अर्ज मंजूर झाल्यानंतर परवानगीची प्रत संबंधित मंडळांना ई-मेलद्वारे प्राप्त होईल. उत्सव साजरा करण्यासाठी वेळेत परवानगी अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# प्रवासांच्या सोई साठी नांदेड रोड वर बजाज शोरूम समोर बस थांबा करा

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी:** मरखेड नांदेड रोड, लगत सवेरा कॉलोनी, फैजान कॉलोनी, रहीमनगर, शहाकॉलोनी, ताजपुरा वार्ड, राजेंद्र प्रसाद वार्ड, आंबेडकर वार्ड असे अनेक रहीवासी वार्ड असल्याने प्रवाशांचे सोयीसाठी बजाज शोरूम - रहीम नगर कडे जाणारा रस्ता या ठिकाणी बस थांबा अत्यंत आवश्यकताआहे. तसेच याठिकाणी दोन्ही बाजुने बस थांबविण्यासाठी भरपुर पण जागा आहे.

नांदेडकडे जातांना बजाज शोरूम समोर नांदेडकडुन येतांना रहीमनगर कडे जाण्याचा रस्ता समोर बस थांबा देवुन प्रवासी नागरीकांना सुविधा देण्याची मागणी मोमेंट फॉर पीस अँड जस्टीस या सामाजिक संघटनेच्या आपली समस्या आपला पुढाकार या मोहीमच्या माध्यमातून सर्व जवळपास राहणाऱ्या वसाहतीतील नागरिकांनी निवेदना व्दारे केली आहे.

निवेदन देतांना शेख असीम ,शेख सलीम,कलीम राज सवेरा कॉलोनी, शेख जाकिर राजेंद्र प्रसाद वार्ड, शेख मुमताज रहमान कॉलोनी, वसीम पठान रहीम नगर सह नांदेड रोड, लगत सवेरा कॉलोनी, फैजान कॉलोनी, रहीमनगर, शहा कॉलोनी, ताजपुरा वार्ड, राजेंद्र प्रसाद वार्ड, न आंबेडकर, वार्ड चे नागरिका सह एमपीजे चे कार्यकर्ते अध्यक्ष मोहसीन राज, डॉ फारूक अब्रार, इरफान खान, सय्यद रजा,अब्दुल जहीर मंसूरी, समीर मुस्तफा आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### अमरावती मध्यवर्ती कारागृहात बैलपोळा साजरा





**अमरावती/प्रतिनिधी:** २२ ऑगस्ट शुक्रवारी संपूर्ण देशभरात बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला अमरावती जिल्ह्यात सुद्धा सर्व शेतकरी बांधवांनी बैलांना सजवून त्यांना नैवेद्य देण्यात आला. यादरम्यान अमरावती मध्यवर्ती कारागृहात दर वर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कारागृह परिसरात असलेल्या शेतात वर्षभर राबणाऱ्या बैलांना कारागृहातील बंदींनी आंघोळ घालून सुंदर सजावट करण्यात आली. यावेळी कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी आणि कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी सुद्धा बैलांना ओवाळून त्यांना नैवेद्य दिला. कारागृहातील बंदिनी सुद्धा बैलांचे पूजन केल्या नंतर कारागृह अधिकारी यांनी बंदी बांधवाना दुपट्टा देऊन त्यांचे सत्कार करण्यात आला.

### जिल्ह्यात २५ ऑगस्ट पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

**वाशीम/प्रतिनिधी:** जिल्ह्यात २२ ऑगस्ट रोजी पोळा, २३ ऑगस्ट रोजी पोळ्याची कर साजरी करण्यात येणार आहे.

जिल्हा हा सण-उत्सवाच्या दृष्टीने तसेच राजकीयदृष्ट्या संवेदनशील आहे. वरील काळात जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे याकरीता २५ ऑगस्टपर्यंत संपुर्ण जिल्हयात पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ १ (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी जारी केले आहे.

हा आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय/निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह,अंत्ययात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस व कार्यक्रमास लागू राहणार नसल्याचे आदेशात नमूद आहे.

### बैलपोळा सणानिमित्त बैलाच्या पाठीवर सातबारा कोरा कोरा चे लिखान





**अमरावती/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांना वर्षभर शेतात मदत करणारा सर्जा राजा म्हणजेच बैलांचा पोळा शुक्रवारी सर्वत्र मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. मात्र अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यात येत असलेल्या बेलोरा गावातील अनेक शेतकऱ्यांनी चक्क बैलाच्या पाठीवर सातबारा कोरा कोरा असे घोषवाक्य लिहून राज्य सरकारला मागणी केली. बेलोरा गावातील उपसरपंच अतुल सिंगन यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी बैलांची आंघोळ घालून रंगरंगोटी करून पाठीवर झुल न टाकता सातबारा कोरा कोरा असे लिखाण करून सरकारचे लक्ष वेधून घेतले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी बैलाच्या पाठीवर स्वतः सातबारा कोरा कोरा असे लिखाण करून रंगरंगोटी करण्यात आली. राज्य सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे सातबारा कोरा करण्याची मागणी बैलपोळा सणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी केली आहे.

### दोन मैत्रिणींचा एकाच बॉयफ्रेंडवरून वाद पेटला

बीड : गेल्या काही महिन्यांमध्ये बीड जिल्हा गुन्हेगारीच्या मोठ्या घटनांमुळे चर्चेत आला आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणापासून जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. अशातच आणखी दोन खुनांच्या घटनाने जिल्हा हादरला आहे. बीडमध्ये एका प्रेम प्रकरणातून होमगार्ड महिलेला संपवण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

# मेहकरात भव्य ट्रॅक्टर पोळा आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मेहकर शहरात भव्य ट्रॅक्टर पोळा उत्सव मोठ्या आनंद, उत्साह आणि पारंपरिक थाटात साजरा करण्यात आला. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या आगळ्यावेगळ्या पोळा मिरवणुकीत शेकडो ट्रॅक्टर रंगीबेरंगी सजावट करून सहभागी झाले होते.

या उत्सवाचे आयोजन शहराध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मिरवणूक जानेफळ रोडहून सुरू होऊन जानेफळ चौक, जिजाऊ चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिका, बसस्टँड मार्गे शितला माता मंदिर येथे पोहोचून, देवीच्या पूजनाने समारोप करण्यात आला.





पोळा हा शेतकऱ्यांच्या कष्ट, त्याग आणि अन्नदात्याच्या निस्वार्थ सेवाभावाचे प्रतीक असल्याचे अधोरेखित करत आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले, "शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल समाजाला समजावे, म्हणूनच पोळा हा सण त्यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. बैल व ट्रॅक्टर हे शेतीचे खरे आधारस्तंभ आहेत, आणि त्यांना वंदन करण्याची परंपरा आपण जपतो आहोत."

या भव्य मिरवणुकीत शेतकरी, महिला, युवक तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजातील विविध घटकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सजवलेल्या ट्रॅक्टरांवर विविध सामाजिक व कृषी विषयक संदेश देणाऱ्या झांक्याही सादर करण्यात आल्या.

यावेळी या ट्रॅक्टर मोर्चात शेतकरी बांधव शिवसेना,युवासेना पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपजिल्हा प्रमुख प्रा आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, युवा सेना तालुका अध्यक्ष अॅड आकाश घोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका प्रमुख दत्ताभाऊ घनवट,मेहकर शहर अध्यक्ष ,अमोल बोरे,साहेबराव हिवाळे पाटील, गणेश गावंडे, कडुबा शेजुळ, शुभम पानखेडे, अमोल मोरे, पवन राजगुरू सुमित घोडे, अमोल घोडे,उद्योजक संदीप गारोळे, अँड संदीप गवई, गोपाल गायकवाड, स्वप्नील राऊत, ऋषी जगताप, विलास शिंदे, राजू आव्हळे,यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते व अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव करणार २३ ऑगस्टला शेतकऱ्यांच्या बांधावर जावुन अतिवृष्टीच्या नुकसानीची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतजमिनीची पाहणी ही केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे २३ ऑगस्टला शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन करणार आहेत



१८ आणि १९ऑगस्ट रोजी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यामध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाला या अतिवृष्टीमुळे शेतात पाणी तुंबुन शेतकऱ्यांच्या शेत जमिनी खरडून गेल्या आहेत अनेक शेतकऱ्यांचे नुकसान या अतिवृष्टीमुळे झाले आहे शेतकऱ्यांच्या बंधावर जावुन नुकसानीची पाहणी करण्यासाठी २३ ऑगस्ट रोजी केंद्रीय मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव हे चिखली तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा करणार आहेत दुपारी २ वाजता चिखली शहरातील पावसामुळे बाधित झालेल्या घरांची पाहणी त्यानंतर चिखली तालुक्यातील सोमठाणा उत्रादा, पेठ,बोरगाव काकडे, पांढरदेव, भरोसा भोरसी या भागात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव शेतकऱ्यांच्या बांधावर जावून करणार आहेत

## आमदार झनक यांनी मूळ गावी गावकऱ्यांसोबत केला पारंपारिक पद्धतीने पोळा सण साजरा

दैनिक आपला विदर्भ



रिसोड : पारंपरिक बैलपोळा सण आमदार झनक यांनी आपल्या मूळ गावी मोठ्या उत्साहात पद्धतीने साजरा केला. गावकऱ्यांच्या प्रेमळ स्वागतात त्यांनी बैलांची पूजा केली आणि सणाचे महत्त्व अधोरेखित करत एकात्मतेचा संदेश दिला.

सकाळपासूनच गावात सणाची तयारी सुरू होती. बैलांना रंगीबेरंगी कपडे, गोंडे, वेशभूषा आणि आकर्षक सजावटीने सजवण्यात आले होते. आमदार झनक यांनी स्वतः बैलांना ओवाळून पूजा केली आणि त्यांना नैवेद्य केले. या प्रसंगी पारंपरिक वाद्यांच्या गजरात ढोल-ताशा, लेझीम पथक, तसेच शेतकरी मंडळींचा पारंपरिक वेश असलेला मिरवणुकीचा कार्यक्रमही पार पडला.

यावेळी उपस्थित गावकऱ्यांना उद्देशून बोलताना आमदार झनक म्हणाले, "बैलपोळा हा केवळ एक सण नाही, तर तो आपल्या कष्टकरी शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या सर्जा-राजाच्या परिश्रमाचा गौरव आहे. आजच्या धावपळीच्या युगात आपली संस्कृती आणि परंपरा जपणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे."ग्रामस्थांनी आमदार झनक यांचे मन:पूर्वक स्वागत करत त्यांच्या उपस्थितीमुळे सणाला अधिकच रंगत आल्याची भावना व्यक्त केली.

महिला मंडळांनी पारंपरिक रांगोळी काढली, तर तरुण वर्गाने बैल सजावटीच्या स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले.सणानिमित्त गावात आनंदाचे वातावरण होते. आमदार झनक यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि योग्य त्या मदतीचे आश्वासन दिले. त्यांचा साधेपणा आणि आपुलकी पाहून ग्रामस्थ भावूक झाले.

## जिल्ह्यातील क्विंस नेकलेस असलेला उतावळी प्रकल्प ओव्हरफ्लो



**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील एकमेव रॉक मॅट्रिक प्रकल्प म्हणून असलेला व बुलढाण्याचा " क्विंस नेकलेस " म्हणून ओळखला जाणारा मेहकर तालुक्यातील देऊळगाव साकरशा जवळ असलेल्या उतावळी नदीवरील प्रकल्प यंदा ऑगस्ट महिण्यातच ओव्हरफ्लो झालाय , प्रकल्प ओव्हरफ्लो झाल्याने सांडव्याचे निसर्गरम्य व विहंगम दृश्य बघण्यासाठी परिसरातील नागरिक येथे गर्दी करीत आहेत. या प्रकल्पाचा सांडवा हा अर्धचंद्र आकाराचा असल्याने अतिशय विहंगम दृश्य येथे बघावयास मिळत आहे. जिल्ह्यातील हा एकमेव प्रकल्प रॉक मेट्रिक पद्धतीने म्हणजे या प्रकल्पाचा सांडवा हा संपूर्णतः खडकावर बांधण्यात आला आहे. अर्धचंद्र आकाराचा सांडवा असल्याने व त्यातून वाहणारे पाणी अगदी मोत्यासारखं दिसत असल्याने या प्रकल्पाला " क्वीन्स नेकलेस " म्हणूनही ओळखल्या जात. या ठिकाणी पर्यटकांची मोठी गर्दी होते व हे केंद्र नवीन पर्यटन स्थळ म्हणून नावारूपासयेतआहे.

## धर्मवीर आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त उद्या आरोग्य शिबिर, रुग्णांनी लाभ घेण्याचे डॉ.माधव वानखेडे यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी:** गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांच्या पुण्यतिथी निमित्त शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष,जुपिटर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रातील हृदयाला छिद्र असलेल्या लहान मुलांची मोफत टू डी इको तपासणी आणि हृदय शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन २४ ऑगस्ट रोजी ठाणे येथील एक्स्प्रेस हायवेस्थित जुपिटर हॉस्पिटल ईस्टर्न सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. सदर शिबिराचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन



शिवसेना वैद्यकीय कक्ष पश्चिम विदर्भ विभागीय सचिव डॉ. माधव वानखेडे यांनी केले आहे.

सदर शिबिर शिवसेना मुख्य नेते व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व खासदार नरेश मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष राज्य अध्यक्ष राम हरी राऊत यांची उपस्थिती राहणार आहे.या मोफत वैद्यकीय इको तपासणी आणि हृदय शस्त्रक्रिया शिबिराचा संबंधीत रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पश्चिम विदर्भ विभागीय सचिव डॉ. माधव वानखेडे यांनी केले आहे.

# बहु-उत्पादन उच्च मूल्य क्लस्टर व पेरि-अर्बन भाजीपाला क्लस्टर स्थापनेसाठी इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय बागायती मंडळाच्या मार्गदर्शनाखाली बहु-उत्पादन उच्च मूल्य क्लस्टर तसेच पेरि-अर्बन भाजीपाला क्लस्टर स्थापनेसाठी इच्छुक संस्थांकडून अभिरुची दर्शविण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

या योजनेद्वारे शेतकरी उत्पादक कंपन्या आणि शेतकरी गटांच्या माध्यमातून उत्पादन, प्रक्रिया, साठवण, मूल्यवर्धन, विपणन यासोबतच तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी उत्पादनक्षमता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

**बहु-उत्पादन उच्च मूल्य क्लस्टर**

आंबा, डाळिंब, द्राक्ष, केळी, लिंबूवर्गीय फळे, टोमॅटो, कांदा, बटाटा, भाजीपाला, फुलशेती, मसाले पिके इत्यादींवर भर. शेतकरी गटांना प्रक्रिया, साठवण, कोल्ड स्टोरेज, ट्रान्सपोर्ट, निर्यात सुविधा उपलब्ध होणार. प्रस्तावित प्रकल्पासाठी किमान वार्षिक २०० कोटी रुपये असणे बंधनकारक. प्रकल्पात किमान २०% शेतकरी घटकाचा सहभाग आवश्यक. २० टक्के टर्म लोन व किमान २० टक्के इक्विटी कॉन्ट्रीबुशन अनिवार्य.

**पेरि-अर्बन भाजीपाला क्लस्टर**

टोमॅटो, कांदा, बटाटा, ढोबळी मिरची, गवार, मटार, वांगी, कोबी, फ्लॉवर, मुळा, शेवगा, पालक, कारली, भोपळा, दोडका, लिंबू, आले, हिरवी मिरची इत्यादी प्रमुख भाजीपाला पिके. शेतकऱ्यांच्या भाजीपाला उत्पादनाचे संकलन, प्रक्रिया, साठवण, विपणन, निर्यात यावर भर. किमान १५ कोटी रुपये असणे आवश्यक. २० टक्के टर्म लोन व किमान २० टक्के इक्विटी कॉन्ट्रीबुशन अनिवार्य.

**अर्थसहाय्याचे स्वरूप**

एकूण प्रकल्प खर्च , या दोन घटकामध्ये विभागलेला आहे. दोन एकूण प्रकल्प मूल्यामध्ये शेतकरी घटक कमीत कमी ४० टक्के असावा, दोन्ही संकल्पनांमधील घटकाची अंमलबजावणी विहित कालमर्यादेमध्ये पुर्ण केल्यास प्रोत्साहनात्मक ५ टक्के अतिरिक्त निधी अनुज्ञेय राहील. मात्र सदर प्रकल्पाकरीता बांधकाम या घटकावरील एकूण खर्च हा प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के पेक्षा जास्त नसावा. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास त्यास प्रकल्प खर्चाच्या १० टक्के प्रोत्साहनात्मक अतिरिक्त निधी अनुज्ञेय राहील.

**अर्ज करण्याची कार्यपद्धती**

प्रस्ताव सादर करणेकरीता अंमलबजावणी यंत्रणेचे पात्रता निकष व सविस्तर मागदर्शक सुचना राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ यांच्या https://nhb.gov.in// या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे. त्यानुषंगाने अंमलबजावणी यंत्रणेकरीता इच्छुक अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दि. १५ ऑगस्ट २०२५ ही दुसऱ्या टप्प्यातील होती. परंतु राष्ट्रीय बागवाणी मंडळ, नवी दिल्ली यांनी दि. २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर कार्यक्रमांतर्गत अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करण्यासाठी इच्छुक अर्जदारांनी ऑनलाईन पोर्टलद्वारे https://www.nhb.gov.in/OnlineApplication/Online_Registration_Intermediate_Page.aspx या वेबसाईटर अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना https://nhb.gov.in राष्ट्रीय बागवानी मंडळ यांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

योजनेबद्दल अधिक माहितीसाठी शीतल थोरात (८३७८९१३७४३), तेजल खरात (९६६५८६०९८०) व महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ,पुणे कार्यालय २९७०३२२८ यांच्याशी संपर्क करावा.